दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (कार्यकारी संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक), नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




मुंबई || वर्ष ६ वे || अंक ६८ || शुक्रवार ०६ मार्च २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## एसटीत मद्यपानास शून्य सहनशीलता; चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२५ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली. यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अनेक मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. तसेच काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. या धक्कादायक प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते.

त्या अनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी



निश्चित करण्यात आली असून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत. सदर चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. तसेच वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. चालक व वाहकांची मद्यपान तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक राहणार आहे. चालकाने नोंद केल्यानंतर त्याची पुन्हा एकदा अल्कोटेस्ट तपासणी करून योग्य नोंद घेतल्यानंतरच पुढील मार्गावर पाठविण्याची सक्ती करण्यात आली आहे. ही तपासणी नियमितपणे होत आहे की नाही, याची खात्री स्थानक प्रमुखांनी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय बसस्थानक व आगार परिसरातील चालक, वाहक आणि विश्रांतीगृहांमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांचीही वेळोवेळी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित विभागातील पालक अधिकाऱ्यांनी आगार व बसस्थानक भेटीदरम्यान या उपाययोजनांची अंमलबजावणी तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, या बाबतीत दक्षता विभागाकडून वेळोवेळी गोपनीय तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. मार्गतपासणी पथक, वाहतूक निरीक्षक, प्रशिक्षण विभाग आणि सुरक्षा विभाग यांच्या माध्यमातून तपासणी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार असून सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मद्यपानाचे दुष्परिणाम याबाबत प्रबोधन केले जाणार आहे. तसेच आगारांमध्ये विशेष 'मद्यपान जनजागृती सप्ताह' आयोजित करून चालक-वाहक व इतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासोबतच जिल्ह्यातील मुख्य बसस्थानक, चालक-वाहक विश्रांतीगृहे तसेच ज्या आगारांमध्ये चालक-वाहक जास्त प्रमाणात थांबतात अशा ठिकाणी मद्यपानास प्रतिबंध करण्यासाठी विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अतिथ्यगृह परिसरातील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट-पंखे आदी सुविधांची देखभाल करण्याची जबाबदारीही संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी प्रशासनाने मद्यपानासंदर्भात कठोर भूमिका घेतली असून या उपाययोजनांमुळे बससेवा अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध होईल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## कोकणासह महाराष्ट्रात काजू लागवड क्षेत्र वाढवणार! सरकार काजू मूल्यवर्धन साखळी विकसित करणार

सिंधुदुर्गनगरी : कोकणात तसेच महाराष्ट्रात काजू लागवड क्षेत्र वाढवण्यावर तसेच आधुनिक स्वयंचलित काजू प्रक्रिया उद्योग उभे करून काजू मूल्यवर्धन साखळी विकसित करण्याचा निर्णय नुकताच मुंबईत झालेल्या एका बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य काजू परिषदेच्या संचालक मंडळाची बैठक नुकतीच मुंबईतील सह्याद्री अतिगृहात झाली.

राज्यात काजूची उत्पादन क्षमता चांगली असतानाही काजू प्रक्रिया उद्योगांसाठी काजू बी आयात करावी लागते त्यामुळे येणाऱ्या काळात राज्यात काजूचे उत्पादन वाढवण्याची आवश्यकता असून यावर बैठकीत तपशीलवार चर्चा करण्यात आली. काजू लागवड क्षेत्र वाढवण्यासाठी कोकणातल्या तसेच राज्यातल्या काजू उत्पादकांना प्रोत्साहन द्यावे, उत्पादक पट्ट्यात साठवणूक क्षमता वाढवण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात आणि तसे नियोजन करावे, यावर बैठकीत भर देण्यात आला. बैठकीला महाराष्ट्र राज्य पणन महासंघाचे कार्यकारी संचालक राहुल कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य काजू परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम, पणन विभागाचे सहसचिव विजय लहाने, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, अपेडाचे उपसरव्यवस्थापक वाघमारे तसेच शासन नियुक्त तज्ज्ञ संचालक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी, डॉ. परशराम पाटील, धनंजय यादव, रूपेश बेलोसे आदी उपस्थित होते.



परदेशातील उद्योगांचा अभ्यास करण्याचा निर्णय

छोट्या काजू प्रक्रिया उद्योजकांसाठी योजना राबवताना कंबोडिया आणि व्हिएतनाम या देशांमधील काजू प्रक्रिया उद्योगांचा अभ्यास करावा आणि त्या धर्तीवर अत्याधुनिक स्वयंचलित प्रक्रिया उद्योग उभे करावेत आणि पर्यायाने काजू मूल्यवर्धन साखळी विकसित करावी, असेही बैठकीत ठरले. काजू परिषद व संबंधित सर्व यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी या दृष्टीने गतीने काम करावे, असा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. त्याचबरोबर व्हिएतनाममध्ये पूर्णतः स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प आहेत त्याच धर्तीवर आपल्याकडेही असे प्रकल्प व्हावेत, या दृष्टीने प्रकल्प अहवाल तयार करणे, आधुनिकीकरणाबाबतचा आराखडा तयार करणे, कोल्हापूर सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांसाठी असे प्रकल्प व्यवहारी आहेत किंवा कसे याचा अभ्यास करून प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

गोदामे उभारल्याने साठवणूक क्षमता वाढेल

पालघर तालुक्यात सुमारे २०० मॅट्रिक टन क्षमतेचा काजू प्रक्रिया उद्योग उभारण्यात यावा आणि त्यासाठी जागा उपलब्ध व्हावी, यावर चर्चा झाली. साठवणूक क्षमतेमुळे स्थानिक पातळीवर अनेक अडचणी उद्भवत आहेत, त्या दूर करण्यासाठी महिला बचत गट आणि सेवा संस्थांचा सहभाग वाढवावा आणि त्यांना सोलर युनिट देण्याबाबत नियोजन करावे तसेच ५०० ते ५००० मेट्रिक टन क्षमतेची गोदामे उभारल्यास सुमारे एक ते सव्वा लाख टन, काजू बीची साठवणूक क्षमता वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. त्यासाठी अशा प्रकल्पांना आवश्यक ते अनुदान शासन स्तरावर देण्यात बाबत भूमिका घेण्याचे ठरले. काजू उत्पादनाचे आवश्यक उद्दिष्ट निश्चित करून तज्ज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यात यावे, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

## रंग उडवल्याच्या रागातून आजीने ४ वर्षांच्या नातवावर उकळते पाणी टाकले

नागपूर : प्रतिनिधी

होळी उत्सवादरम्यान नागपूरमध्ये एक भयंकर घटना घडली. अंगावर रंग उडवल्याच्या रागातून आजीने आपल्या नातवाच्या अंगावर उकळतं पाणी ओतलं. या घटनेत ४ वर्षांचा चिमुकला गंभीर जखमी झाला. त्याच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमे-यामध्ये कैद झाली. याचा व्हीडीओ व्हायरल होत आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरच्या कोराडीत हा संतापजनक प्रकार घडला. होळीच्या दिवशी अंगावर रंग उडवल्यामुळे संतप्त झालेल्या स्वत:च्या आजीने आपल्या चार वर्षांच्या नातवावर उकळते पाणी ओतले. ही अमानुष घटना सीसीटीव्ही कॅमे-यामध्ये कैद झाली आहे. या घटनेत ४ वर्षांचा ओम हरिश वांगे हा चिमुकला गंभीर जखमी झाला. सिंधू ठाकरे असे आजीचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सीसीटीव्ही फुजेटमध्ये दिसत आहे की, ओम घराबाहेर पिचकारीने रंग खेळत होता. यावेळी ओमची आजी सिंधू ठाकरे या होळीच्या लाकडावर गरम केलेले पाणी बादलीत भरून घरी नेत होत्या. त्याठिकाणी ओम खेळत होता. खेळकरपणे तो त्याठिकाणी आला आणि त्याने पिचकारीतील रंग आजीच्या अंगावर उडवला. आजीने रागाच्या भरामध्ये हातामध्ये असलेल्या बादलीतील उकळते पाणी थेट ओमच्या अंगावर ओतले. उकळते पाणी अंगावर पडताच ओम वेदनेने जोरजोरात रडू लागला.

## पुण्यात राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धेचे आयोजन

पुणे : विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी,भारत व राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक-दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा मंगळवार,दि. १० मार्च रोजी होणार आहे.स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे अशी माहिती एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ.आर.एम.चिटणीस यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९ वाजता होणार आहे.तसेच, पारितोषिक वितरण समारंभ याच दिवशी सायं. ७ वा. होणार आहे.समारंभास ट्रिपल महाराष्ट्र केसरी आणि अर्जुन अवॉर्डी पै.नरसिंग यादव प्रमुख पाहुणे तसेच,हिंद केसरी पै.जगदीश कालीरमण हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.हिंद केसरी पै.दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै.आप्पा कदम, महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र पै.विजय उर्फ विकी बनकर हे उपस्थित राहणार आहेत. विश्वशांती केंद्र ,माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा.कराड यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धा होणार आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १९वे वर्ष आहे.महाराष्ट्रातील देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. द्वितीय क्रमांकास रोख रूपये १,००,०००/-, तृतीय क्रमांक ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजनगट ५७, ६१, ६५, ७०, ७४,८६ आणि ८६ प्लस ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके ,सुवर्ण,रौप्य,कास्यं पदक, मेडल,प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल.

## गरजूंना घर देण्यासाठी शासन कटिबद्ध

मुंबई : देशातील प्रत्येक कुटुंबाला घर उपलब्ध व्हावे, हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत देशात एकही कुटुंब घराविना राहू नये, या उद्देशाने केंद्र सरकारने महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला आहे. महाराष्ट्रातही या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत असून गेल्या वर्षी राज्यात जवळपास चार लाख घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, गेल्या वर्षी राज्यातील २८ लाख २४ हजार ३८६ घरांना मान्यता देण्यात आली. ही देशाच्या इतिहासातील घरकुलांची सर्वात मोठी मंजुरी आहे. गेल्या एका वर्षात राज्यात ३ लाख ९५ हजार २२२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून हा एक विक्रम आहे. सध्या २३ लाख ९२ हजार २४२ घरकुले प्रगतीपथावर आहेत. केंद्र शासनाने निधी वितरणासाठी 'सिंगल नोडल एजन्सी' आणि 'रिअल टाइम इंटिग्रेटेड फंड ट्रान्सफर' ही नवीन प्रणाली सुरू केल्यामुळे काही काळ हप्त्यांच्या वितरणात विलंब झाला होता.

सूर्योदय
शुक्रवार ०६ मार्च २०२६

संपादकीय

## भक्तांमध्ये धावपळ

गत २४ तासांत राज्यातील काही भागांना अवकाळी पावसाचा फटका बसला. मध्यरात्री नागपूर शहरासह जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. ऐन उन्हाळ्यात अचानक कोसळलेल्या पावसामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांची मोठी धावपळ उडाली. दिवसभर कडक ऊन असतानाच रात्री अनपेक्षितपणे पावसाने जोर धरल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. या पावसामुळे शहरातील काही घरांचे नुकसान झाले. राज्यासह देशातील हवामानात मोठा बदल होत आहे. थंडी, पाऊस आणि उन्हाळा अशा तिन्ही हंगामांचा अनुभव येत आहे. सकाळी थंडी आणि दुपारी कडक ऊन अशी स्थिती आहे. उत्तरेकडे थंडी तर राज्यात थंडी जवळपास गायब झाली आहे. पहाटे थोडासा गारठा जाणवतो आहे. राज्यातील काही शहरांत वायुप्रदूषण हा गंभीर मुद्दा बनला आहे.

मुंबईमध्ये वायुप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून हवा घातक बनली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात सध्या पावसाला पोषक वातावरण आहे. उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत असतानाच पावसाने हजेरी लावली आहे. धुळ्यात १४ अंश सेल्सिअस अशी राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवसांत राज्यात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान या भागात पावसाचा अंदाज आहे. गत काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. फेब्रुवारी महिना असूनही पावसाने हजेरी लावली आहे. सकाळी थंडी, दुपारी कडक ऊन आणि अचानक सायंकाळी वादळी वा-यासह पाऊस अशी स्थिती अनेक भागात पाहायला मिळते. या बदलत्या हवामानामुळे नागरिकांबरोबरच शेतक-यांचीही मोठी अडचण झाली आहे. सोमवारी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली.

कर्नाटकपासून मराठवाड्यापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे राज्यात पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर, हिंगोली, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये विजांसह पावसाची शक्यता आहे. इतर भागातही आकाश ढगाळ राहू शकते. पुढील दोन दिवस पावसाचा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला. माजलगाव तालुक्यात वादळी वा-यासह झालेल्या पावसामुळे ज्वारी, हरभरा तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले. परळी तालुक्यातही गहू आणि हरभरा पिकांना फटका बसला. लातूर जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे गारांसह २० मिनिटे पाऊस झाला. अहमदपूर शहर व तालुक्यात, चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथे रविवारी रात्री हलक्या सरी कोसळल्या. शिरूर अनंतपाळ येथे जोरदार वारे आणि पाऊस झाला तर गुडसूर परिसरात रिमझिम पाऊस झाला. उदगीर तालुक्यात ढगाळ वातावरण होते. येरोळ आणि निलंगा परिसरात जोरदार पाऊस झाला. रेणापूर तालुक्यात गारपिटीमुळे हरभरा, गहू, ज्वारी, करडी ही रबी पिके आडवी झाली.

वादळी वा-याने थैमान घातल्याने शेतक-यांची धावपळ उडाली. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रम सुरू आहेत. अचानक आलेल्या वादळी पावसाने त्यामध्ये व्यत्यय आला, भाविक भक्तांमध्ये धावपळ उडाली.

वादळी वा-यासह थैमान घातलेल्या पावसामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. हातातोंडाशी आलेले हरभरा, गहू, ज्वारीची पिके मातीमोल झाल्याने शेतक-यांना पुन्हा एकदा सरकारच्या आश्वासनावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. कांदे, मेथी, टोमॅटो, शेपू, मिरची, दोडका, कोबी, पालेभाज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यंदा भरपूर प्रमाणात मोहोर आलेल्या आंब्याचे अवकाळी पावसाने नुकसान केले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतक-यांना आर्थिक झळ सोसावी लागत असल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे. राज्यात सध्या हवामान झपाट्याने बदलत असून उन्हाचा तडाखा वाढताना दिसत आहे. १८ फेब्रुवारीनंतर झालेल्या पावसामुळे काही भागात गारवा निर्माण झाला होता.

# दापोली तालुक्यात "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर" अभियानाची ७ मार्च पासून सुरुवात

दापोली ५ मार्च :- महसूल आणि वन विभागाच्या निर्देशानुसार दापोली तालुक्यात ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर'' अभियानाच्या टप्पा क्र.१ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. या अभियानास रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदल तसेच दापोलीचे उपविभागीय अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले असून, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीम.अर्चना बोंबे यांच्या नेतृत्वाखाली मंडळ स्तरावर शिबीरांचे आयोजन करणेत येत आहे. सदर अभियान ७ मार्च ते १६ मे २०२६ या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे.

याबाबत आज विशेष पत्रकार परिषदेमध्ये डॉक्टर सूर्यवंशी उपविभागीय अधिकारी दापोली आणि अर्चना बोंबे तहसीलदार दापोली यांनी माहिती दिली.

अभियानाची प्रमुख उद्दिष्टे :

नागरिकांच्या महसुली तक्रारींचे तात्काळ निराकरण

प्रलंबित प्रकरणांचा आढावा व जलद कार्यवाही

विविध दाखल्यांशी संबंधित अडचणी दूर करणे,

प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित करणे.

नियोजित शिबीर स्थळे :

१) आंजर्ले- महावीर भवन केळशी दिनांक ०७ /०३/२०२६

२) पालगड :- ग्रामपंचायत कार्यालय विसापूर दिनांक १४/०३/२०२६

३) देगांव:-कुणबी भवन देगांव दिनांक १०/०४/२०२६

४) वाकवली :- श्रीमान मधुराबाई बुटाला हायस्कूल व ज्युनि कॉलेज गावतळे .दिनांक ११/०४/२०२६

५) वेळवी:- ग्रामपंचायत कार्यालय वेळवी दिनांक १७/०४/२०२६

६) दाभोळ:-ग्रामपंचायत कार्यालय दाभोळ.दिनांक १८/०४/२०२६

७) बुरोंडी :- करजगांव हायस्कूल करजगांव.दिनांक ०८/०५/२०२६

८) आगरवायंगणी:- कुणबी भवन आगरवायंगणी दिनांक ०९/०५/२०२६

९) हर्णे :- एन.डी. गोळे हायस्कूल हर्णे .दिनांक १५/०५/२०२६

१०) दापोली:- सर विश्वेश्वरैया सभागृह, डॉ.बा.सा. को. कृ. विद्यापीठ दापोली .दिनांक १६/०५/२०२६

शिबीरात दिल्या जाणाऱ्या सेवा :-

महसुल विभाग:- ७/१२ उतारा, ८अ उतारा, राजपत्राने नाव दुरुस्ती आदेश, लक्ष्मी मुक्ती योजना, ई-फेरफार, इतर महसुली तक्रारींचे निवारण इत्यादी.

आरोग्य विभाग :- आयुष्यमान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची नोंदणी करणे, आरोग्यविषयक विविध योजनांबाबत सेवा इत्यादी.

कृषी विभाग- ॲग्रीस्टॅक, पीएम किसान लाभार्थी नाव नोंदणी, पात्र लाभार्थी यांची ई-केवायसी इत्यादी.

भूमि अभिलेख विभाग: विषयी तांत्रिक माहितीचे सादरीकरण, ई-रेकॉर्डस, भू-नकाशा प्रदर्शन, पाणंद रस्ते मोजणी अभियानाबाबत माहिती इत्यादी.

निवडणूक विभाग: मतदान नोंदणी करिता नमुना ६,७,८ अर्ज स्वीकारणे.

पुरवठा विभाग :- नवीन रेशनकार्ड, डिजिटल रेशनकार्ड बाबत सेवा पुरवणे इत्यादी. वरीलप्रमाणे महसुल विषयक व इतर विभागातर्फे विविध सेवा/दाखले यांचे प्रस्ताव तयार करुन लाभार्थ्यांना पारदर्शक पद्धतीने जलदरित्या वितरण करण्याचे कामकाज सदर शिबीरांमध्ये करण्यात येणार आहे.

तरी वरील क्षेत्रीय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या ठिकाणी महसूल मंडळातील नागरिकांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहून महसुल विषयक विविध सेवा/दाखले प्रमाणपत्र यांचा लाभ घ्यावा व महसुल प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन दापोली तहसिलदार अर्चना बोंबे यांनी केले आहे.

# दिघेवाडी येथे ॐ म्हसोबा चषक २०२६ क्रिकेटचा रंगणार थरार

सुधागड पाली/राम तुपे

श्री म्हसोबा ११ दिघेवाडी ग्रामस्थच्या वतीने मर्यादित ओव्हर अर्म क्रिकेट सामने शनिवार ७ मार्च व रविवार ८ मार्च २०२६ रोजी दिघेवाडी येथे आयोजित करण्यात आले आहेत. ङ्ग या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे यांच्या शुभहस्ते होणार आहे. या स्पर्धेसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेचा थरार निमंत्रित २४ संघात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.या स्पर्धे दरम्यान नामवंत खेळाडू हजेरी लावणार आहेत.या स्पर्धेचे दिमाखदार नियोजन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.ङ्ग या स्पर्धेसाठी खालील आकर्षक बक्षिसे प्रथम क्रमांक ५५,५५५/- श्री म्हसोबा ११ संघ दिघेवाडी यांस कडून,द्वितीय क्रमांक ३३.३३३/- श्री. संकेत पांडुरंग दिघे यांस कडून,तृतीय क्रमांक १५,०००/श्री. कैलास दत्ताराम शिंदे यांस कडून,चतुर्थ क्रमांक ११,०००/- कैलास मानाजी मांढरे/सुमित सुभाष मांढरे यांस कडून रोख रक्कम स्वरूपात बक्षीस देण्यात आली आहेत तर प्रथम आणि द्वितीय क्रमांक आकर्षक चषक श्री संतोष गुप्ता शाखाप्रमुख उ.बा.ठा. सांताक्रूझ शाखा क्र ८७ यांस कडून,तृतीय क्रमांक चषक श्री. विलास राठोड, सचिन डोबले, नरेश शिंदे यांस कडून,चतुर्थ क्रमांक चषक श्री. चंद्रकांत रामचंद्र महाडिक शिवसेना उ.बा.ठा सह संपर्कप्रमुख रोहा यांस कडून देण्यात येणार आहेत. ङ्ग तसेच उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक चषक श्री अविकात साळुंके यासकडून, सामनावीर टी-शर्ट स्वामी भक्त श्री प्रफुल विचारे ,प्रवीण विचारे (मुंबई) यांस कडून, मालिकावीर (सायकल)कुमारी श्रीशा संदेश दिघे यांस कडून,सन्मानचिन्ह स्व.जयेंद्र ना. दिघे यांच्या स्मरणार्थ श्री वैभव जयेंद्र दिघे यांस कडून ,सामन्यासाठी लागणारे बॉल बॉक्स श्री मिलिंद तुकाराम वांद्रे (उ. बा.ठा, गट शाखाप्रमुख नालासोपारा या सर्व उदारदेणगीदाते यांच्या कडून देण्यात येणार आहे.




# अटल टिंकलिंग लॅब प्रदर्शनामध्ये न्यू इंग्लिश स्कूल पोफळीच्या मॉडेलची राज्यस्तरावर निवड

दिनांक २ मार्च रोजी राज्य शैक्षणिक मंडळ पुणे व राज्य शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) आणि लेंड अ हॅन्ड इंडिया या संस्थेच्या मार्फत रत्नागिरीतील राधाबाई जागुष्टे हायस्कूल या ठिकाणी रत्नागिरी ,सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्ह्यांचं अटल लॅब प्रदर्शन पार पडले. विद्यार्थ्यांकडून नवनिर्मिती व्हावी या उद्देशाने हे प्रदर्शन भरवण्यात आलेले होते.या प्रदर्शनामध्ये इलेक्ट्रॉनिक्स,मेकॅनिकल, डिजिटल आणि थीम बेस्ड असे चार प्रकारचे प्रोजेक्ट सादर करायचे होते. मेकॅनिकल विभागामधून न्यू इंग्लिश स्कूल पोफळी प्रशालेने तयार केलेले स्मार्ट किचेन होल्डर या प्रोजेक्टला दोन्ही जिल्ह्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळाला*व या मॉडेलची राज्यस्तरावर निवड झाली. ङ्ग या प्रदर्शनाचे उद्घाटन रत्नागिरी जिल्ह्याचे माननीय शिक्षणाधिकारी श्री. मेंगाणे साहेब यांच्या हस्ते झाले.त्याचप्रमाणे डायटच्या प्रमुख तावशिकर मॅडम, त्याचप्रमाणे रत्नागिरी तालुक्याचे विज्ञान मंडळ प्रमुख उपस्थित होते.ङ्गया प्रदर्शनामध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग मधील अटल लॅब मंजूर असलेल्या शाळा सहभागी झाल्या होत्या. सर्व वैज्ञानिक प्रतिकृतींचे तज्ञ परीक्षकांच्या उपस्थितीमध्ये परीक्षण करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये मेकॅनिकल विभागातून परशुराम एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पोफळी प्रशालेने बनवलेल्या स्मार्ट किचेन होल्डर या प्रतिकृतीचा प्रथम क्रमांक आला व या प्रतिकृतीची निवड राज्यस्तरावर झाली. हे सर्व मॉडेल बनवण्यासाठी प्रशालेचे अटल टिंकरिंग प्रमुख श्री मायनाक सर ,श्री यादव सर व श्री पाटील सर त्यांचे मुलाचे मार्गदर्शन लाभले. हे मॉडेल बनवण्यासाठी प्रशालेमधील विद्यार्थी प्रतीक गुळवे, हर्ष सोळुंके, श्रवण पेढांबकर,अंश घाणेकर, शौर्य चाळके यांनी परिश्रम घेतले. या यशाबद्दल सर्व सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे परशुराम एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी त्याचबरोबर प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ पाटील मॅडम ,पालक प्रतिनिधी,पालक त्याचबरोबर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले

# दापोली तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिरांचे आयोजन

दापोली प्रतिनिधी : दापोली तालुक्यामध्ये मध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान ०७ मार्च ते १६ मे २०२६ दरम्यान राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दापोली आणि मंडणगड या दोन्ही तालुक्यांमध्ये समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी डॉ. विजयकुमार सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दरम्यान दिली. या पत्रकार परिषदेला तहसीलदार दापोली अर्चना बोंबे उपस्थित होत्या.ङ्गयेत्या तीन महिन्यात मंडल स्तरावर प्रशासकीय सेवा थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी येत्या तीन महिन्यांत मंडल स्तरावर या शिबिरांचे आयोजन केले जाईल. या शिबिरांच्या तारखा आणि ठिकाणांची माहिती ग्रामपंचायत सरपंच प्रत्येक गावचे तलाठी यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवली जात आहे.ङ्ग या समाधान शिबिरांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ महसूल विभागच नाही, तर इतर शासकीय विभागांच्या सेवाही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

यात प्रामुख्याने: विद्यार्थ्यांसाठी विविध दाखले: शालेय आणि उच्च शिक्षणासाठी लागणारे विविध प्रकारचे शासकीय दाखले या शिबिरात त्वरित निर्गमित केले जातील.तसेच कायदेविषयक माहिती: महाराष्ट्र शासनाने तुकडेबंदी कायदा आणि अपुर्शक (अकृषक) संदर्भात केलेल्या नवीन सुधारणांची माहिती आणि प्रसिद्धी या शिबिरांच्या माध्यमातून केली जाईल.

उपविभागीय अधिकारी डॉ. विजयकुमार सूर्यवंशी यांनी दोन्ही तालुक्यातील ग्रामस्थांना आणि नागरिकांना या शिबिरांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. ''शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी या संधीचा फायदा घ्यावा,'' अशी विनंती त्यांनी यावेळी केली.




# फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिरांचे आयोजन

कर्जत (जयेश जाधव) मा.मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड राजेंद्र सावंत, यांच्या मार्गदर्शनाखाली ''न्याय आपल्या दारी'' या उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.ङ्गदि.०२ मार्च ते दि.३० मार्च २०२६ या कालावधीत संपूर्ण रायगड जिल्ह्यात फिरते लोक अदालत कार्यरत राहणार असून विविध तालुक्यांमध्ये जाऊन प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा तसेच नागरिकांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.ङ्गया उपक्रमाचा उद्घाटन समारंभ दि. ०२ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता रायगड जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे एस. आर. तिवारी, जिल्हा न्यायाधीश-२ यांच्या हस्ते संपन्न झाला.ङ्गया फिरत्या लोक अदालतीसाठी श्रीकांत उपाध्ये (निवृत्त न्यायाधीश) यांची कक्ष न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा न्यायाधीश ३ रायगड अलिबाग एस.डी. भगत तसेच न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड अलिबाग श्रीमती तेजस्विनी निराळे तसेच अलिबाग वकील संघटनेचे अध्यक्ष प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ए.डी.पाटील व सचिव अमित देशमुख आणि सर्व न्यायिक अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग उपस्थित होतेङ्गही फिरती लोक अदालत दि. ३० मार्च २०२६ पर्यंत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जाऊन लोक अदालत आयोजित करणार असून नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड अलिबाग राजेंद्र द.सावंत यांनी केले आहे. न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून सर्वसामान्य नागरिकांना जलद सुलभ व विनामूल्य न्याय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देश या उपक्रमामध्ये आहे.



# लोकरंजन

१ सिनेरंग

तलास चित्रपटातील धम्माल हळदी गीताचा प्रकाशन सोहळा संपन्न..

तलास हा आगामी मराठी चित्रपटही प्रेक्षकांच्या मनात कुतूहल जागविणारा आहे. या चित्रपटाच्या कथानकात नेमके काय दडलेय याची कल्पना शीर्षकावरून अजिबात येत नाही. याउलट चित्रपटाचे शीर्षक उत्सुकता वाढविण्याचे काम करणारे आहे. नुकतेच या चित्रपटातील धम्माल गाण्याचे प्रकाशन करण्यात आले आहे.निर्मात्या दीपा सावंत-खोत यांनी दीपतारांगण क्रिएशन्सच्या बॅनरखाली तलास या रहस्यमय-रोमांचक चित्रपटाची निर्मिती केली आहे. तलासमध्ये प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारी मर्डर मिस्ट्री आहे. रहस्यमय घडामोडींची गुंतागुंत आणि अखेरीस होणारी रहस्याची उकल प्रेक्षकांना रोमांचक अनुभव देणारी आहे. उदय गणपत जाधव यांनी या चित्रपटाचे अभ्यासपूर्ण दिग्दर्शन केले असून, कथा आणि पटकथालेखनही त्यांनीच केले आहे. एका दिमाखदार सोहळ्यात तलास चित्रपटामधील धम्माल गाण्याचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. हळदीच्या सोनसळी रंगात न्हालेलं हे ग्लॅमरस, जल्लोषमय आणि रॉयल थाटात साकारलेलं गीत प्रकाशित करण्यात आले. या गो बायांनो हळद घेऊनशी... या गीतकार-संगीतकार विजय गाडेकर यांच्या लेखणीतून अवतरलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या गाण्यावर गौतमी पाटीलने नृत्य केले असून नृत्यदिग्दर्शन नरेंद्र पंडित यांनी केले आहे. महाराष्ट्राची लाडकी गायिका वैशाली सामंत यांनी हे गाणे गायले आहे. या चित्रपटात चिन्मयी सुमित, गणेश यादव, प्रणव रावराणे, राहुल पाटील, पूजा जैस्वाल, निलेश भेरे, वेदांत खोत, रेखा राणे, अजय पाध्ये आणि गौतमी पाटील आदी कलाकार आहेत.




२स्वावलंबी ज्येष्ठांसोबत 'तिघी' टीमची रंगली सात्विक होळी

स्त्रीच्या स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा ठाम संदेश देणाऱ्या 'तिघी' चित्रपटाच्या टीमने यंदाची होळी एका अर्थपूर्ण उपक्रमातून साजरी केली. पुण्यातील 'मातोश्री ओल्डएज होम' येथे राहाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसोबत भारती आचरेकर, नेहा पेंडसे बायस, सोनाली कुलकर्णी, दिग्दर्शिका जिजीविषा काळे यांनी रंग, गाणी आणि आनंदाची उधळण केली.'तिघी'मध्ये ज्येष्ठ, स्वाभिमानी आणि स्वतंत्र स्त्रीची भूमिका साकारणाऱ्या भारती आचरेकर यांच्या व्यक्तिरेखेने प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधले आहे. उतारवयात स्वावलंबाने आणि स्वाभिमानाने जगणे हा मुद्दा या चित्रपटात अधोरेखित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे 'मातोश्री ओल्डएज होम'मधील स्वावलंबी व स्वाभिमानी ज्येष्ठ नागरिक आपल्या राहाण्याचा खर्च स्वतः उचलतात आणि तिथे घरासारखीच आपुलकी, सन्मान आणि स्वातंत्र्य अनुभवतात. वृद्धाश्रम हा असहायतेचे नाही, तर स्वावलंबनाचा पर्याय असू शकतो, हा मुद्दा 'तिघी' ठळकपणे मांडतो.याच विचाराला अनुसरून 'तिघी'ची टीम पुण्यातील 'मातोश्री ओल्डएज होम'मध्ये होळी साजरी करण्यासाठी पोहोचली. यावेळी भारती आचरेकर ज्येष्ठांसोबत गाणी गायल्या, सर्वांनी मिळून सात्विक पद्धतीने, पर्यावरणपूरक रंगांमध्ये होळी साजरी केली. गुलालाच्या हलक्या रंगांमध्ये आणि मनमोकळ्या गप्पांमध्ये ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहाण्यासारखा होता.

३प्रेक्षकांवर मोहिनी घालायला येतेय तुंबाडची मंजुळा

कोकण म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो निसर्गरम्य परिसर, नयनरम्य समुद्रकिनारा आणि याचभोवतीने फिरणाऱ्या किती तरी गूढ अशा रहस्यमय कथा आणि सोबतीला गावाकडच्या गजाली. भुता - खेतांवरील चर्चा हा गावाकडच्या माणसांचा कायमच मनोरंजनाचा विषय राहिलेला आहे. यातच वीतभर घडलेल्या गोष्टी हातभर लांब करून सांगणे हा जणू अनेकांचा आवडता छंदच. अशाच काहीशा गूढ वातावरणातली आणि कोकणाच्या परंपरेला साजेशी एक अतिशय रंजक गोष्ट झी स्टुडिओजने आपल्या प्रेक्षकांसाठी आणली आहे. तुंबाडची मंजुळा असे या चित्रपटाचं नाव असून होळीच्या दिवशी सोशल मीडियावरून या चित्रपटाचं आगळं वेगळं मोशन पोस्टर प्रसिद्ध करण्यात आलं आहे. ज्यातून चित्रपटाबद्दलची उत्सुकता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. एका घराच्या अर्धवट बंद दाराआड दिसणारा एक गूढ चेहरा आणि दोन्ही कवाडांच्यामध्ये अडकलेले काही हात.. जणू काय घरातून बाहेर पडायचा ते प्रयत्न करत आहेत हे सांगणारं हे पोस्टर अतिशय औत्सुक्यपूर्ण झालेलं आहे. येत्या ५ जून रोजी म्हणजेच जागतिक पर्यावरण दिनी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

४ टेलीरंग

नव्या पिढीतील दिग्दर्शकांचा शोध घेण्यासाठी 'नॅशनल झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्ट

संस्कृती, सर्जनशीलता आणि व्यापकतेवर आधारित भविष्योन्मुख कॉन्टेन्ट इकोसिस्टम उभारण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधिक बळकटी देत ''* तर्फे झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्ट या आपल्या प्रकारच्या अशा पहिल्याच, उद्योगांची व्याख्या करणाऱ्या संपूर्ण भारतभर राबवल्या जाणाऱ्या ओम्नीचॅनेल उपक्रमाच्या शुभारंभाची घोषणा करण्यात आली आहे. देशभरातील नवोदित चित्रपट निर्मिती प्रतिभेचा शोध घेऊन त्यांचे संगोपन करणे आणि त्यांची कला साजरी करणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे.देशातील विविध क्षेत्रांमध्ये आपली वेगळी ओळख प्रस्थापित केलेले फिल्ममेकर्स एकाच राष्ट्रीय व्यासपीठावर एकत्र आणत, ही स्पर्धा भारतीय मनोरंजन क्षेत्रातील सर्वांत महत्त्वाकांक्षी बहुभाषिक कलागुण शोध उपक्रमांपैकी एक ठरत आहे. खरोखरच सर्वसमावेशक दृष्टीकोनातून राबवलेल्या या उपक्रमात हिंदी , मराठी , बंगाली , तेलुगू, तामिळ , मल्याळम आणि कन्नड अशा सात प्रमुख भाषांचा समावेश असून विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि चित्रपट परंपरांतील कथाकथनकारांना ह्या उद्योगातील दिग्गजांच्या पाठबळासह राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आ



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## रत्नागिरी जिल्ह्याच्या भूजल पातळीत वाढ करण्याकरता जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना डॉ. प्रशांत परांजपे यांनी सादर केला कृती आराखडा

रत्नागिरी जिल्ह्याची भूजल पातळी दिवसेंदिवस खालावत आहे प्रचंड पाणीटंचाईचा सामना हा जिल्ह्याला आता करावा लागणार आहे किल्ले तीन वर्ष सातत्याने जलजीवन मिशनच्या माध्यमातून डॉक्टर प्रशांत परांजपे यांनी भूजल साठा वाढ करण्याकरता विविध ग्राम पंचायतींना मार्गदर्शन केले आहे त्याच समवेतच भूजल पातळी वाढ करण्याकरता कृती आराखडा देखील वारंवार सादर केला आहे सदर आराखडा दिनांक ७ एप्रिल २०२३ रोजी तत्कालीन मुख्याधिकारी कार्यकारी अधिकारी यांना सादर केला होता आज पुन्हा पाच मार्च २०२६ रोजी यांनी आराखडा सादर केला आहे टंचाईग्रस्त आराखडा सादर करण्याकरता धावणाऱ्या जिल्हा परिषदेने भूजल पातळीत वाढ करण्याकरता विशेष नदीचे उपलब्धता करावी आणि त्या समावेतच कृती आराखडा करून प्रत्येक ग्रामपंचायती अंतर्गत

असणाऱ्या प्रत्येक नागरिकाला प्रबोधन करून कृती आराखडा यशस्वी करावा अशी मागणी जलप्रेमी पर्यावरण अभ्यासक डॉ. प्रशांत परांजपे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे. या कृती आराखड्यानुसार ङ्गमार्च पासून कृती कार्याला - कामाला सुरुवात.ङ्ग मार्च- १ ते १५ मार्च -- गाव/ वाडी येथील ग्राप दवाखाने ,शाळा, अंगणवाडी, वाचनालये, मंदिरे, आरोग्य विभाग , व्यायामशाळा अर्थात गावातील/ वाडीतील सर्व सार्वजनिक इमारतीचे छापरावर पडणा-या पावसाचा थेंब जमिनी जीरवण्याचे काम पूर्ण करणे.

१६ मार्च ते ३०. मार्च - -. गावातील / वाडीतील बहुमजली इमारतींचे छतावरील पाणी साठवणूक विषयी काम पूर्ण -

१ एप्रिल ते २० एप्रिल - गावातील प्रत्येक घरानचे. छतावरील पडणारा पाण्याचा थेंब वाचवण्याचे काम पूर्ण करणे.

२० एप्रिल ते १० मे - गावातील नदी / नाले, सार्वजनिक विहीरीतील गाळ उपसा आणि स्वच्छ करणे.आणि सार्वजनिक विहीर पुनर्भरण आखणी पूर्ण करणे.ङ्ग११ मे ते १५ मे :- झालेल्या सर्व तीनही टप्यातील कामाचे पुनर्सर्वेक्षण करणे व त्रुटी भरून काढणे.

१५ ते ३० मे - राखीवङ्गङ्ग्या सर्व कामाकरिता - स्वच्छाग्रही, जलसेवक, जलकर्मी, जलसुरक्षा रक्षक , पाणी व स्वच्छता समिती ग्राम , सरपंच व सर्व सदस्य, ग्रामपंचायत प्रशासन - युवक मंडळे, प्रभावी व्यक्ती यांना विश्वासात घेऊन व समवेत घेऊन आपल्याला काम करावं लागेल.

असा लिखित आराखडा डॉ. प्रशांत परांजपे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केला आहे.

## नांदवी कुंभारवाडा येथे संत तुकाराम बीज निमित्त सत्यनारायण पूजा व महिला दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी नितेश पुरारकर

तालुका माणगाव, जिल्हा रायगड येथील ग्रामपंचायत नांदवी अंतर्गत नांदवी कुंभारवाडा येथे



दिनांक ०५ मार्च २०२६ रोजी श्री संत तुकाराम बीज निमित्त धार्मिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने श्री सत्यनारायणाची महापूजा मोठ्या भक्तिभावाने व पारंपरिक पद्धतीने संपन्न करण्यात आली. गावातील भाविक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक विधीमध्ये सहभाग घेतला.या पवित्र प्रसंगाचे औचित्य साधून गावातील महिलांनी एकत्र येत महिला दिनाचा कार्यक्रम देखील मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला. महिलांनी पारंपरिक गीते, नृत्य आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे वातावरण आनंदमय केले. तसेच महिलांसाठी विविध मनोरंजक खेळ, छोटे-छोटे उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांमध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमादरम्यान गावातीलङ्गवयोवृद्ध महिलांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. त्यांना शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या आयुष्यातील कष्ट, अनुभव आणि समाजासाठी केलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. तसेच विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या महिलांना बक्षीस वाटप करून त्यांचे प्रोत्साहन करण्यात आले.या कार्यक्रमामुळे नांदवी कुंभारवाडा परिसरात सामाजिक एकोप्याचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. गावातील सर्व महिला, युवक व नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवत हा कार्यक्रम यशस्वी केला. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम घडवत हा कार्यक्रम अत्यंत आनंदात व उत्साहात पार पडला.

# पालखी भेटीने, तिन्ही बहिणींच्या गळाभेटीने रंगतो आबलोलीतील शिमगोत्सव

आबलोली (संदेश कदम)

कोकण आणि शिमगोत्सव यांचं अनोखं नातं आहे. गुहागर तालुक्यातील आबलोली येथे आबलोली आणि खोडदे येथील ग्रामदेवता श्री. नवलाई देवी यांच्या पालखी भेटीचा, तिन्ही बहिणींच्या गळा भेटीचा सोहळा रंगताना दिसला याच गळाभेटीने आबलोलीतील शिमगोत्सव उत्साहात, शांततेत व फटाक्यांच्या आतिषबाजीत आणि ढोल ताशांच्या गजरात आनंदाने साजरा करण्यात आला .हा सोहळा प्रत्यक्ष पाहताना डोळ्याचे पारणे फिटल्याचा अनुभव प्रत्यक्ष पाहायला मिळाला. नवलाई देवींची गळाभेट होताना दोन्ही पालखींच्या आतील नारळांची आपो - आप अदलाबदल होते. अशी आख्यांकीका सांगण्यात येते. अबलोली खालील पागडेवाडी येथील जे - जे मानकरी १) रमेश गोणबरे,२) प्रमोद गोणबरे,३) राजेश गोणबरे,४) दिलीप गोणबरे,५) सुरेश गोणबरे,६) शंकर गोणबरे नऊ दिवस नवलाई देवीच्या नावाने श्रद्धापूर्वक कडक उपवास करतात ते मानकरी नवलाई देवीच्या पालखी समोर सहानेवर धारदार शस्त्राने स्वतःच्या अंगावर हाणून घेतात मात्र यावेळी कसल्याही प्रकारची इजा होत नाही किंवा साधे खर्चतही नाही किंवा रक्तही येत नाही एकूणच हा पालखी भेट, गळाभेट सोहळा भक्तांसाठी, भाविकांसाठी नेत्र सुख असते या पालखी भेट, गळाभेट सोहळ्याला आबलोली - खोडदे पंचक्रोशीतील जनता बहुसंख्येने उपस्थित होती.ङ्ग फाल्गुन पौर्णिमेच्या सकाळी सूर्योदयाबरोबर आबलोली -




खोडदे येथील होम पेटवले जातात परंतु यावर्षी नेमके ग्रहण असल्याने दिनांक ०३ मार्च २०२६ ऐवजी दिनांक ०४ मार्च २०२६ रोजी पहाटे ०६:३० वाजता होम पेटवण्यात आले. आणि दुपारनंतर आबलोली येथील श्री. नवलाई देवी, खोडदे सहानेची वाडी येथील श्री. नवलाई देवी ,खोडदे गणेशवाडी येथील श्री. नवलाई देवी. या तिन्ही पालख्या, तिन्ही बहिणी आपल्या लाडक्या भावाला म्हणजे गोपाळजीला भेटून आल्यानंतरच आबलोली येथील कै. दादा कारेकर यांच्या जागेतील मैदानावर नाचविण्यात येतात. याच वेळी दुपारनंतर सहाने वर जत्राही भरते देवींच्या दर्शनानंतर भावीक, नागरिक व लहान मुले जत्रेत खरेदी करतात. विशेष म्हणजे आबलोली येथील श्री. नवलाई देवीच्या पालखीला खोडदे येथील श्री. नवलाई देवीच्या पालख्या क्रमाक्रमाने भेटतात या बहिणींची गळाभेट होताना या देवतांमध्ये बहिणीचं नातं असल्याने ग्रामस्थ आवर्जून सांगतात यावेळी दोन्ही गावातील लोक आपल्या खांद्यावर पालखी वाहून नेणाऱ्या भक्तांना उचलून घेतात आणि गावातील ग्रामस्थांच्या खांद्यावर उभे असलेल्या ग्रामस्थांच्या खांद्यावरील पालख्या वाजत - गाजत ढोल ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या अतिष बाजीत एकमेकांची गळाभेट करतात व पालख्यांची ही गळाभेट होते. यावेळी दोन्ही पालकांची, दोन्ही बहिणींची गळाभेट होताना आतील नारळांचीही अदलाबदल होते. अशी आख्यांकीका आवर्जून सांगितली जाते. आबलोली - खोडदे येथील पालख्यांची, दोन्ही बहिणींची गळाभेट होत असताना खोडदे येथील दुसरी पालखी एका बाजूस ग्रामस्थ नाचवीत असतात. पहिली पालखी भेटून निघून गेल्यावर दुसरी पालखी आबलोलीच्या ग्रामदेवतेला भेटते. अतिशय शिस्तबद्ध उत्साहात हा सोहळा पार पडतो. आबलोलीतील कै. दादा कारेकर यांच्या जागेतील मैदानावर रंगणारा हा पालखी भेट, गळाभेट सोहळा आधुनिक युगातही तितकाच संस्मरणीय ठरतो आहे.

## चेरफळवाडी येथील साईनाथ क्रीडामंडळाचा वतीने विधवा महिलांना मायेच पातळ भेट

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव : सुधागड तालुक्यातील साईनाथ क्रीडा मंडळ चेरफळवाडी या मंडळाकडून होली सणाचे औचित्य साधून गावातील विधवा महिला यांच्यासाठी मायेची भेट म्हणून पातळ वाटप करण्यात आले विधवा महिलांचं दुःख त्यांनाच माहिती असत.

मंडळातील सर्व सदस्यांनी विचार करून गावाची एकी कशी टिकून राहील यासाठी गावामध्ये गावाच्या लोकांच्या कल्याणाचे काम करून वेगवेगळे उपक्रम राबवण्याचे काम हे मंडळ करीत आहे. वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन खेळाडूंना प्रोत्साहन गावातील अडीअडचणी सापडलेल्या लोकांना मदत. साप चावलेल्या लोकांना दवाखान्यात नेणे,हे असे अनेक उपक्रम हे मंडळ राबवत असते. मंडळाचे अध्यक्ष वसंत शिद व इतर सर्व सदस्य हे सामाजिक काम करीत आहेत विशेष म्हणजे या मंडळात शिक्षक, पोलीस, फार्म हाऊस वर काम करणारे, मोलमजुरी करणारे सदस्य आहे. गाव वाडीतील गोरगरिबांसाठी सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या या मंडळाचे ङ्गतालुक्यात कौतुक होत आहे. मंडळाचे एक ध्येय व इच्छा आहे की प्रत्येक वाड्यामध्ये असेच सगळे एकत्र राहावेत.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )